POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२७९ ● मुंबई, रविवार, ११ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नव्या भारताचं नवं रुप दाखवणारे १५ मुद्दे

- यह नया भारत है, भारताचं आक्रमक रुप दिसलं, भारताने पाकिस्तानात घुसून कारवाई केली. दहशतवादाविरूद्धची आपली भूमिका आजही ठाम असल्याचं आणि त्यासाठी कुठलीही तडजोड करणार नसल्याचं पाकिस्तानला दाखवून दिलं.
- भारताने हवाई ताकद दाखवली - इंडियन एअरफोर्सचं शक्तीशाली रुप दिसलं, वायूदलाने आधी ढाल बनून हल्ले रोखले, त्यानंतर तलवार बनून चाल केली, टार्गेट ठेवून दहशतवादी अड्डे उद्धवस्त केली. तर, पाकिस्तानने ४०० पेक्षा जास्त ड्रोन हवेत सोडून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ते ड्रोन भारतीय सैन्याने हवेत जिरवले.
- सागरी सामर्थ्य - भारताने नेव्हीलाही सज्ज ठेवून, पाकिस्तानला समुद्री हल्ल्याच्या अनामिक भीतीत ठेवलं. आयएनएस विक्रांतसह भारताच्या युद्धनौका पूर्ण ताकदिनीशी समुद्रात उतरल्या होत्या. त्यामुळे, बलसागर भारत जगभरातील देशांना पाहायला मिळाला. लष्कर-आर्मी - भारतीय सैन्य दलाने तिन्ही स्तरावर आपलं सामर्थ्य दाखवून दिलं. भूदल, नौदल आणि वायूदलाने प्रत्येक कारवाईला चोख प्रत्युत्तर दिलंय. सीमारेषेवर भूदलाने गोळीबाराला जशास तसे उत्तर दिले. तर, एअर फोर्सने 'हवा'ई ताकद दाखवून पाकिस्तानला शांत केलं.
- संयमी आणि करारीबाणा - छेडेंगे तो छोडेंगे नहीं असा पवित्रा भारताने घेतला होता. त्यानुसार, भारताने स्वतःहून पाकिस्तानच्या नागरिकांन इजा होईल असे कुठलेही कृत्य केलं नाही. पण, पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवाईला जोरदार उत्तर दिलं.
- भारताची मुत्सदेगिरी - या तीन दिवसांत भारताने आंतरराष्ट्रीय स्ट्रॅटिजी उत्तमपणे दाखवून दिली. जगभरात पाकविरोधी मत बनवण्यात भारताला यश आलं, सर्व देशांशी संपर्क ठेवणे, सर्वांना पटवून दिलं. तसेच, पहलगामवरील हल्ल्याला उत्तर देत दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले.
- एअरस्ट्राईकनंतर रात्रीच्या अंधारात पाकिस्तानने केलेले हल्ले भारतीय सैन्य दलाने परतवून लावले, जर हल्ला कराल तर जशास तसं प्रत्युत्तर मिळेल हे दाखवून दिले. त्यानुसार, हवेतच पाकिस्तानेच ड्रोन पाडले, विमानही पाडलं.
- पाकिस्तानविरुद्धच्या लढाईत भारताने एकाही नागरी वस्तीवर हल्ला केला नाही, सर्वसामान्य नागरिक आणि निष्पाप जीवांना धोका पोहोचणार नाही याची काळजी घेत युद्धजन्य परिस्थितीतही भारताने माणुसकीचा नवा आदर्श घालून दिला.
- पाकिस्तानचं एअर डिफेन्स सिस्टिम बंद पाडून भारताची तांत्रिक शक्ती भारतीय लष्काराने दाखवली. भारतीय एअर फोर्स कुणालाही टक्कर द्यायला आणि हवाई हल्ले परतवून लावायला सक्षम असल्याचा संदेशच या कारवाईतून गेला.
- भारताची देशांतर्गत राजकीय परिपक्वता, सत्ताधारी आणि विरोधक एकत्र असल्याचं चित्र तीन दिवसांत पाहायला मिळालं. सर्वपक्षीय नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना साथ देत भारतीय सैन्य दलाचे मनोबल वाढले. त्यामुळे, राजकीय परिपक्वतेचा नवा आदर्शही पाहायला मिळाला.
- पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात राजकीय नेतृत्त्वाचा खमकेपणा पुन्हा एकदा दिसून आला. भारतीय सैन्य दलाच्या तिन्ही प्रमुखांशी आणि संरक्षणमंत्री व गृहमंत्र्यांसोबत पंतप्रधानांनी दररोज बैठका घेऊन भूमिका स्पष्ट केली. तसेच, लष्कराला महत्त्वाचे अधिकार देत राजकीय नेतृत्वाचा खमकेपणा दाखवून दिला.
- भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर हे नाव देऊन सर्व भारतींना या मिशनसोबत भावनिकरित्या जोडलं. त्यामुळे, देशातील महिला वर्गही युद्धजन्य परिस्थितीत स्वतः पुढे येऊन आपले मत मांडू लागला. सिंदूर का बदला दहशतवाद्यांचं सिंदूर हेच भारताने दाखवून दिलं.
- भारतीय सैन्य दलातील कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग ऑपरेशन सिंदूरच्या चेहरा बनला. दहशवाद्यांनी महिलांना विचारुन हल्ला केला, भारताने महिला अधिकाऱ्यांना कारवाईच्या घडामोडी जगाला सांगण्यासाठी बसवलं. एक नवा चेहरा जगाला दिसला.
- दहशतवाद्यांनी धर्म विचारुन मारलं, त्यामुळे भारतातील हिंदू मुस्लिम दरी वाढवण्याचा प्रयत्न केला, पण तो देशवासियांनी तो कट उधळून लावला. भारतातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचं नवं उदाहरण या हल्ल्यानंतर पाहायला मिळालं. भारतातील मस्जिद आणि मुस्लिमांकडून ठिकठिकाणी पाकिस्तानचा निषेध करण्यात आला.
- दहशतवादी कारवाया हेदेखील यापुढे युद्धच समजलं जाईल असं भारताने सांगितलं. यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्णय घेण्यात आल्याने आता दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला चांगलाच धडा बसला आहे. दहशवाद्यांचा छुपा अजेंडा चालवल्यास पाकिस्तानला जगासमोर उघडं पडावं लागेल.
- भारतीय लष्कराचे सामर्थ्य या निमित्ताने दिसून आलं. सीमारेषेवर तैनात जवान, समुद्रातील युद्धनौका आणि ड्रोन हल्ले, मिसाईल्स आणि हवाई जेचं नवं युद्ध तंत्रज्ञान जगाने पाहिलं.



# ३ दिवसात जगाने पाहिला 'नया भारत'

## नव्या भारताचं नवं रुप दाखवणारे १५ मुद्दे

**■नवी दिल्ली | प्रतिनिधी :**
काश्मीर खोऱ्यातील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत होता. या संतापानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील दहशतवाद्यांना, हल्लेखोरांना सोडणार नाही अशा शब्दात सरकारची भूमिका जाहीर केली. त्यानंतर, पाकिस्तानविरुद्ध व्यापार संबंध, जलसिंधू करार यासह अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. तर, ७ मे रोजी भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हद्दीत घुसून एअर स्ट्राईक केला. त्यामध्ये, ९ दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आलं होतं. तेव्हापासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकप्रकारे युद्धजन्य परिस्थिती सुरू झाल्याचं दिसून आलं. सीमारेषेवर शस्त्रसंधीचं उल्लंघन होऊन गोळीबार सुरूच होता, तर पाकिस्तानकडून ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्नही झाला. भारताने दोन्ही ठिकाणी चोख प्रत्युत्तर दिलं. मात्र, पहलगाम हल्ल्यापासून संयमाने आणि रणनीतीने भारताने घेतलेल्या भूमिकेचं कौतुक होत आहे. तर, गेल्या तीन दिवसात भारतीन सैन्याने यह नया भारत है... हे दाखवून दिलंय. ७ मे मध्यरात्री १.३० वाजल्यापासून ते आज १० मे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव व लष्करी कारवाई टोकाला पोहोचल्या होत्या. त्यामुळे, दोन्ही देशांत युद्ध होईल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरही इतर देशांचे लक्ष भारताकडे लागले होते. मात्र, गेल्या ३ दिवसांत भारताने नव्या भारताचं नवं रुप दाखवलं आहे. रणनीती ते युद्धभूमीपर्यंत भारत सरकार आणि भारतीय सैन्य दलाने दाखवलेल्या सामर्थ्यशाली व युद्धनितीच्या १५ ठळक गोष्टी...

### पाकिस्तानकडून कुरापती सुरूच

दरम्यान पाकिस्तानकडून कुरापती सुरूच आहेत, भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, भारतानं हा हल्ला परतून लावला, त्यानंतर भारतानं प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानवर पुन्हा एकदा ड्रोन हल्ला केला, पाकिस्तानच्या १५ शहरांमध्ये ५० ड्रोन हल्ले करण्यात आले, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानची रडार सिस्टिम उद्धवस्त करण्यात आली, मात्र त्यानंतर देखील पाकिस्तानने भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला, सीमा भागामध्ये देखील पाकिस्तानकडून गोळीबार सुरूच आहे. भारताकडून देखील पाकिस्तानच्या या कृतीला चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे, भारतानं केलेल्या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसानं झालं आहे. त्यामुळे तणाव आणखी वाढला आहे.

## भारत -पाकिस्तानमध्ये तणाव, मुंबई पोलिसांचा मोठा निर्णय



**■मुंबई | प्रतिनिधी :**
पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यामध्ये २६ जणांना आपला जीव गमवावा लागला, यामध्ये २५ भारतीय तर एका नेपाळी नागरिकाचा समावेश होता. या हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात कठोर पाउलं उचलली, सिंधू पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली, तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा देखील रद्द करण्यात आले, त्यानंतर भारतानं पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला, या हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांची ९ ठिकाणं उद्धवस्त करण्यात आली. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे.

पाकिस्तानकडून भारतावर हल्ल्याचा प्रयत्न होत आहे, मात्र भारताकडून हे हल्ले परतून लावण्यात आले आहेत. प्रत्युत्तर म्हणून भारतानं देखील पुन्हा एकदा पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला, या हल्ल्यामध्ये पाकिस्तानची संपूर्ण रडार सिस्टिम उद्धवस्त करण्यात आली आहे, या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे आता भारत आणि पाकिस्तानमधील तणाव प्रचंड वाढला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी आता मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईत उद्यापासून फटाके आणि रॉकेट उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सीमेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. ११ मे पासून ते ९ जूनपर्यंत मुंबईत फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे, या संदर्भात मुंबई पोलिसांकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.

## भारत पाक युद्धाच्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानने घेतला मोठा निर्णय... महत्वाचा आदेश जारी

**■मुंबई | प्रतिनिधी :**
जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला. या हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने ७ मे २०२५ पासून 'ऑपरेशन सिंदूर' सुरु केले आहे. भारतानं केलेल्या एअर स्ट्राईकनंतर चवताळलेल्या पाकिस्ताननं प्रतिहल्ले सुरु केले आहेत. यामुळे भारत पाक यांच्यात युद्ध स्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण देशात हा अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांसह प्रमुख मंदिरांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. साईबाबा संस्थानने मोठा निर्णय घेतला आहे. साई बाबा मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनासाठी नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. साई मंदिरात फुलहार व प्रसाद नेण्यास मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी साईबाबा संस्थांनसह बैठक घेतली. बैठकीनंतर मंदिर परिसरात पाहणी देखील केली. आगामी धोका लक्षात घेता साईबाबा संस्थानने हा निर्णय घेतल्याचे समजते. पुढील आदेशापर्यंत साईमंदिरात फुलहार व प्रसाद नेण्यास मनाई असेल. साईबाबा संस्थान मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी ही माहिती दिली. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ मंदिराची सुरक्षा देखील वाढवण्यात आली आहे. मंदिर परिसरात दंगल नियंत्रण पथक आणि कमांडो पोलिस पथक तैनात करण्यात आले आहेत. भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षाच्या कारणास्तव हा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. पाकिस्तान आणि भारतामधील वाढता तणाव लक्षात घेता देशातील अनेक महत्त्वाच्या शहरांना अलर्ट देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर शहराला देखील असाच अलर्ट देण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व पर्यटनस्थळी पोलिसांचा बंदोबस वाढवण्यात आला आहे. तसेच जायकवाडी धरणावर येणाऱ्या पर्यटकांना चार दिवसांची बंदी घालण्यात आली आहे.



### सिद्धिविनायक मंदिरात रविवारपासून नारळ, फुल, प्रसादावर बंदी

सुरक्षेच्या कारणास्तव ११ मेपासून देवतांना अर्पणासाठी नारळ, फुलमाळा आणि प्रसाद नेण्यास बंदी घालण्यात येणार असल्याचे सिद्धिविनायक मंदिराच्या व्यवस्थापनाने शुक्रवारी सांगितले. प्रभादेवी परिसरात वसलेले हे मंदिर जगप्रसिद्ध असून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर म्हणाले की, हे मंदिर दहशतवाद्यांच्या टार्गेटवर आहे. सरकार आणि पोलिसांकडून अनेक सुरक्षा सल्ले आम्हाला मिळतात. अलीकडेच एका वरिष्ठ पोलिस अधिकानाने ट्रस्टसोबत बैठक घेतली होती. त्यांनी सांगितले की, सुरक्षेच्या कारणास्तव धोका निर्माण होऊ शकतो. प्रसादामध्ये विष मिसळले जाऊ शकते. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरूपात नारळ, फुलमाळा आणि प्रसाद देवतांना अर्पण करण्यास बंदी घालण्यात येत आहे, असे सरवणकर यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, भारत-पाकिस्तानमधील तणाव लक्षात घेता ही तात्पुरती खबरदारी म्हणून हा निर्णय घेतला गेला आहे. सरवणकर यांनी सांगितले की, मंदिराबाहेरील फुलविक्रेत्यांशी चर्चा केली असून त्यांनी आपला प्रसादाचा विद्यमान साठा संपवण्यासाठी ११ मेपासून ही अंमलबजावणी सुरू करण्याची विनंती केली होती, ती मान्य करण्यात आली. या निर्णयासोबतच मंदिर ट्रस्ट श्री गणेशाचे आवडते दुर्वा आणि फुले भाविकांसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे. सुरक्षा वाढवण्यासाठी मंदिर ट्रस्ट २० माजी सशस्त्र दलातील जवानांची भरती करणार आहेत. ते सशस्त्र असतील, असेही सरवणकर यांनी सांगितले. भाविकांची सुरक्षा ही पोलीस आणि मंदिर ट्रस्टची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्रात तिसऱ्या भाषेचा पर्याय

### हिंदी सक्ती मागे घेतल्यानंतर सरकारकडून तिसऱ्या भाषेचा अभ्यास

**■मुंबई | प्रतिनिधी :**
राज्यात पहिलीपासून हिंदी सक्तीवरून माघार घेतल्यानंतर शिक्षण विभागाने अद्याप सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध केलेला नाही. या संदर्भात, 'अन्य भारतीय भाषा उपलब्ध करून देण्याबाबत, तसेच त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या सुविधांबाबत अभ्यास करण्यात येत आहे,' असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पायाभूत आणि शालेय स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला. त्यात पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी हा विषय अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र, या निर्णयाला राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातून तीव्र विरोध झाल्यानंतर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी 'अनिवार्य' शब्दाला स्थगिती देत असल्याचे जाहीर करून सुधारित निर्णय प्रसिद्ध करण्याची घोषणा २२ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत केली होती. त्यानंतर अद्याप सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही.

राज्यातील शाळांमध्ये मराठीऐवजी हिंदी भाषा अनिवार्य केलेली नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं. तसंच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये तीन भाषा शिकण्याची संधी देण्यात



आल्याचं फडणवीस म्हणाले. तसंच हिंदी सारख्या भारतीय भाषेला आपण विरोध करतो मात्र इंग्रजीचे गोडवे गातो अशी टिप्पणीही त्यांनी यावेळी केली. तर यापूर्वीच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात पाचव्या इयत्तेपासून हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय झाला असल्याकडे भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी लक्ष वेधलं.

## मैत्रिणीनेच केला घात! कल्याणमध्ये ड्रग्ज देऊन मित्रांच्या हवाली केले, महिनाभर सामूहिक बलात्कार

**■कल्याण | प्रतिनिधी :**
मैत्रिणीनेच तरुणीचा घात केल्याची माहिती समोर आली आहे. नशेचे इंजेक्शन देऊन तरुणीला घरात डांबून ठेवत तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. टिटवाळाजवळील बल्याणी परिसरात ही घटना घडली आहे. २१ वर्षीय तरुणीचा आजीसोबत घरात वाद झाल्याने ती घर सोडून कामावर ओळख झालेल्या मैत्रीणीच्या घरी काही दिवस राहत होती. मात्र या मैत्रिणीनेच तिचा गैरफायदा घेत घेत दुसऱ्या मैत्रिणीच्या मदतीने या तरुणीला नशेचे इंजेक्शन आणि ड्रग्ज पाजून महिनाभर कोंडून ठेवले. तर, मैत्रिणीच्या ओळखीतील चार ते पाच जणांनी तिच्यावर महिनाभर बलात्कार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून टिटवाळा पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपींचा शोध सुरु केला आहे. शबनम, जीनत, गुड्डू, गुलफाम, लियाकत, अली ईराणी आणि एक अनोळखी इसम अशी या आरोपींची नावे आहेत.

१९ मार्चला तरुणीचे आजी बरोबर भांडण झाल्याने तिने रागाच्या भरात घर सोडले होते. आपल्या बरोबर काम करणारी मैत्रीण जिनत हिच्या बल्याणी येथील घरी गेली. तर दुसरी मैत्रीण शबनम तिच्याच शेजारी राहत असल्याने सदरची तरुणी कधी जीनतच्या तर कधी शबनमच्या घरी राहत होती. १० दिवसानंतर तिने आपण घरी जात असल्याचे मैत्रीणीना सांगताच त्या दोघींनी संगमत करून आपला मित्र गुड्डू यास चारचाकी गाडी घेऊन बोलावले. गुड्डू आणि त्याच्याबरोबर तरुणीच्या ओळखीचा असलेला गुलफाम असे दोघे गाडी घेऊन आल्यानंतर शबनम आणि जीनत यांनी या तरुणीला घरी सोडण्याच्या बहाण्याने गाडीत बसवले. मात्र तरुणीला घरी न सोडता तिला एनआरसी कंपनीच्या मागे असलेल्या चाळीत चाळीचे काम दाखविण्याच्या बहाण्याने नेले. तिथे नेल्यानंतर शबनमने या तरुणीच्या मानेवर इंजेक्शन देत तिला बेशुद्ध केले.

बेशुद्ध अवस्थेतच तिला रामबाग येथील लियाकतच्या रूम मध्ये सोडण्यात आले. तिथे लियाकत याने तिच्यावर ती बेशुद्ध असतानाच बलात्कार केल्याचा आरोप या तरुणीने तक्रारीत केला आहे. सलग चार ते पाच दिवस आपण शुद्धीवर येताच पुन्हा आपल्याला नशेचे इंजेक्शन देत आपल्यावर बलात्कार केल्याचे या तरुणीचे म्हणणे आहे. आपल्याला घरी जाऊ देण्याचू विनंती केल्यानंतर या पाच जणांनी आंबिवली येथील अली इराणी याला बोलावून घेत मला तक्रार केल्यास फाशी देण्याची तसेच घरच्यांना मारण्याची धमकी देत आजी विरोधात खोटी तक्रार देण्यास भाग पाडले. यानंतर या तरुणीला सातत्याने नशेचे औषध देत कधी आंबिवली येथील चाळीत तर कधी रामबाग येथील लियाकतच्या घरी नेत तिच्यावर सातत्याने अत्याचार केले जात होते. दरम्यान ३ मे रोजी रात्री १२ वाजता आंबिवली येथील चाळीत तरुणी एकटीच असताना शुद्धीवर येताच तिने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला मात्र दरवाजाला कुलूप असल्याने तिने खिडकीतून जोरजोरात रडून आपल्याला बाहेर काढण्याची विनंती केल्यानंतर एका व्यक्तीने दरवाजाचे कुलूप तोडून तिला तिथून बाहेर काढत तिच्या आजीच्या घरी सोडले. तब्बल महिनाभर या तरुणीवर सातत्याने अत्याचार होत असल्याने शरीराने आणी मनाने पूर्णपणे खचलेल्या या तरुणीला आजीने धीर दिल्यानंतर मंगळवारी शबनम, जीनेत, गुड्डू, गुलफाम, लियाकत, अली ईराणी याच्यासह आणखी एका अनोळखी इसमाविरोधात टिटवाळा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरु केला आहे.



### कल्याणमध्ये ११ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार, दुकानाचे शटर बंद केले आणि...

**■कल्याण | प्रतिनिधी :**
कल्याणमध्ये एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. कल्याणमध्ये ११च्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाला आहे. एका दुकानदाराने या मुलीला दुकानात बोलावून तिच्यावर केला आहे. पोलिसांना आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. खडकपाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे.

कल्याण जवळील आंबिवली परिसरात घडलेल्या या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. पीडित अकरा वर्षीय मुलगी ही आपल्या कुटुंबासह राहते. तिचे आई-वडील भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. ५ मे रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास सदर अकरा वर्षीय अल्पवयीन मुलगी मैत्रिणीच्या घरी जाते असे सांगून घराच्या बाहेर पडली. मात्र ती सायंकाळी घरी परतली नाही. या मुलीच्या कुटुंबीयांनी आजूबाजूच्या परिसरात शोध सुरू केला. दुसऱ्या दिवशी सकाळी ही मुलगी त्याच परिसरात आढळून आली.

तिला विश्वासात घेऊन तिच्या कुटुंबीयांनी तिला विचारले असता तिने सांगितलेला धक्कादायक प्रकार ऐकून तिच्या कुटुंबाच्या पायाखालची जमीन सरकली.

आंबिवली येथील नदीकिनारी शूटिंग सुरू होती. ही शूटिंग पाहण्यासाठी ही अल्पवयीन मुलगी त्या ठिकाणी गेली होती. या नदीच्या परिसरातच गणेश म्हात्रे या नराधमाचे किराणामालाचे दुकान होते. गणेश याची नजर या अल्पवयीन मुलीवर पडली त्याने तिला दुकानात बोलवले जबरदस्तीने दुकानात थांबण्यास सांगितले. मात्र या अल्पवयीन मुलीने विरोध करताच तिला दुकानात ओढून घेत दुकानाचे शटर बंद करून या मुलीवर लैंगिक अत्याचार केला. पीडित अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांनी याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीनुसार खडकपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करत तत्काळ नराधम गणेश म्हात्रे याला बेड्या ठोकल्या आहेत.

## येत्या ४-५ दिवसांत मुसळधार पाऊस

### हवामान खात्याकडून यल्लो अलर्ट




**■मुंबई | प्रतिनिधी :**
उन्हाळ्यात महाराष्ट्रात मुसळधार पावासाने हजेरी लावली असून राज्यभरात गारठा पडला आहे. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना गारवा अनुभवायला मिळत आहे. शुक्रवारी दुपारी ३ ते ४.३० पर्यंत पावसाने महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात हजेरी लावले. शहराचा पारा ३२ अंशापर्यंत खाली उतरला असून अनेक ठिकाणी गारठा पडला आहे. मनमाड शहर व परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. सकाळपासून उन्हाचा तडाखा वाढलेला असताना रात्री ८ वाजेपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पावसाने हजेरी लावल्याने रात्री उशीरा पर्यंत भाजी विक्रेत्यांचे आणि नागरिकांचे हाल झाले आहेत. अचानक जोरदार पाऊस झाल्याने हवेत गारवा वाढला आहे. हवेत गारवा निर्मान झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. जोरदार वारा पाऊस यामुळे शहरातील काही भागातील विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. तसेच नाशिक शहरात जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली असून तेथेही अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. जोरदार पाऊस आल्याने अनेक ठिकाणी पाणी साचले. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे होणार नुकसान झाले आहे. हवामान खात्याने पुढील चार ते पाच दिवस यल्लो अलर्ट दिला आहे. देशभरात पाच चक्रीवादळे निर्माण झाल्यानंतर, भारतीय हवामान विभागाने अनेक राज्यांमध्ये पाऊस आणि वादळांचा इशारा जारी केला आहे. ११ मे पर्यंत मध्य आणि वायव्य भारतात पाऊस, वादळ आणि विजांचा अंदाज आहे. पुढील काही दिवसांत राज्य अस्थिर हवामानासाठी सज्ज होत असताना, भारतीय हवामान विभागाने तामिळनाडूतील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची सूचना जारी केली आहे, ज्यामध्ये वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, पुढील दोन दिवसांत मुंबईत पाऊस आणि गडगडाटी वादळे होतील, असे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आता थांबायचं नाय!

मागच्या कित्येक रात्रींपासून सीमेवरील रहिवासी तर, किमान दोन रात्रींपासून देशभरातील जनता निवांत झोपलेली नाही. भारत-पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या जोरदार धुमश्चक्रीकडे भारतीय जनतेसह जगभरातील अनेक देशांचे बारीक लक्ष लागून राहिलेले आहे. एलओसीवर भारत-पाकमध्ये वर्षभर चकमकी सुरूच असतात. दहशतवाद्यांचे अनेक प्रयत्न भारतीय लष्कराकडून हाणून पाडले जातात. परंतु यावेळची परिस्थिती वेगळी आहे. अगदी कच्छ (१९६५), सियाचीन (१९८४) आणि कारगील (१९९९) संघर्षापेक्षाही वेगळी. पाकच्या नापाक हल्ल्यांना उधळून लावताना भारताने पाकव्याप्त (पीओके) जम्मू-काश्मीरसह थेट आंतरराष्ट्रीय सीमेच्या १०० किमी आत घुसून पाकच्या शहरांना टार्गेट केले आहे. नुसतेच टार्गेट नाही तर, दहशतवाद्यांचे अड्डे नेस्तनाबूत केले आहेत. भारत-पाकमध्ये झालेल्या १९७१ सालच्या युद्धानंतर असे पहिल्यांदाच घडते आहे. म्हणूनच यंदाची आरपारची लढाई अनेक अर्थांनी निर्णायक ठरू शकते, असे सर्वांनाच वाटत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाल्यानंतर भारताने आधी डिप्लोमॅटिक चाली खेळत पाकिस्तानला भ्रमाच्या भोपळ्यात ठेवले. सिंधू पाणी करार रद्द करणे, डिप्लोमॅट्सना परत बोलवणे, व्हिसा रद्द करणे यापेक्षा वेगळे पाऊल भारत उचलणार नाही, असे पाकिस्तानलाही वाटत असावे. खरे तर, सुरुवातीला आपल्या नागरिकांकडूनही केंद्राच्या या नरमाईच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. पाकिस्तानविरुद्ध कठोरात कठोर कारवाई करुन कायमची अद्दल घडवावी, अशा संतापाचा लाटा प्रत्येक भारतीयाच्या मनात उसळत होत्या. अखेर चौदा-पंधरा दिवस संयम ठेवल्यानंतर भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत संयुक्त कारवाई करत पाकमधील ९ दहशतवादी अड्ड्यांना उद्धवस्त केले. यामध्ये ५ टार्गेट्स पाकव्याप्त काश्मीरातील आणि ४ टार्गेट्स ही थेट पाकिस्तानी शहरांतील होती. भारताच्या एअर स्ट्राईकमधील प्रत्येक निशाणा अचूक लागला. १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा आपण केलाय. यामध्ये कंदाहार विमान अपहरणाचा सूत्रधार रौफ अझहर म्हणजेच मसूद अझहरचा भाऊ ठार झाला. याकरिता सैन्य दलाच्या रणनीतीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. लष्करी कारवाईसोबत भारताच्या डिप्लोमॅटिक लेव्हलवरील हालचालींनाही तेवढेच महत्त्व द्यावे लागेल. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मध्यरात्री जगभरातील ४० हून अधिक देशांच्या प्रमुखांशी संवाद साधत भारताच्या गोटात खेचले. अमेरिका, रशिया, ब्रिटन, युरोपियन युनियन आदी देश दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतासोबत उभे राहिलेत. याआधी पाकच्या मदतीसाठी नेहमीच मुस्लीम राष्ट्रे धावून यायची. परंतु यावेळी तुर्कीये वगळता एकाही मुस्लीम राष्ट्राकडून पाकला समर्थन, पाठिंबा वा साधी सहानुभूतीही मिळू शकली नाही, हे विशेष. उलट पाकने दहशतवाद्यांना पोसणे थांबवावे, अशा कानपिचक्या अमेरिकेकडून ऐकाव्या लागल्या. तर चीननेही आतापर्यंत हस्तक्षेपाचा प्रयत्न केलेला नाही. पाकसाठी हा दुहेरी धक्का होता. ७-८ मे रोजी सूर्य अस्ताला जाताच भारताला प्रत्युत्तर देण्यासाठी चवताळलेल्या पाकिस्तानने आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केली. पाकने भारताच्या जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजराच्या सीमेलगतच्या शहरांना टार्गेट करत थोडेथोडके नाही, तर तब्बल ४०० हून अधिक ड्रोन हल्ले केले, अनेक क्षेपणास्त्रेही डागली. परंतु भारताच्या सक्षम एअर डिफेन्स सिस्टिमने पाकचे हे सर्व नापाक हल्ले उधळून लावले. भारताने पाकचे हल्ले हवेतल्या हवेतच उधळले, ८ क्षेपणास्त्रेही पाडली. एस-४०० सुदर्शन चक्र ही एअर डिफेन्स सिस्टिम पाकचे हल्ले परतवून लावण्यात खूपच मोलाची ठरली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान जगभराने रशियावर निर्बंध लादलेले असताना भारताने अमेरिका आणि युरोपियन युनियनचा दबाव झुगारून ही एअर डिफेन्स सिस्टिम रशियाकडून खरेदी केली होती. जी आज आपल्या कामाला आली. ही संरक्षण सामुग्री खरेदी करतेवेळी केंद्र सरकारने दाखवलेला कणखरपणा आणि भारत-रशियाचे जुने मैत्रीसंबंध ऐनवेळी कामाला आले. इस्त्रायलला टार्गेट करताना हमास जी रणनीती वापरतो तीच रणनीती पाक यावेळी वापरत आहे. एकामागोमाग एक असंख्य ड्रोन-मिसाईल हल्ले करुन एअर डिफेन्स सिस्टिमला चकवा द्यायचा आणि लष्करी तळ, नागरी वस्त्या उद्धवस्त करायच्या हा पाकचा मनसुबा आहे. परंतु भारताच्या एकाही ठिकाणाला पाक आतापर्यंत लक्ष्य करू शकले नाही. भारतीय ड्रोन्सनी लाहोरमध्ये मुसंडी मारत त्यांचे एअर डिफेन्स सिस्टिम उद्धवस्त केले. रावळपिंडी, चकवाल, गुजरानवाला, अटक, बहावलपूर आदी दहशतवादी अड्ड्यांना ड्रोन हल्ल्यांनी भाजून काढताच आता अल्लानेच आम्हाला वाचवावे म्हणत पाकचे खासदार ढसाढसा रडलेत. हे खरे असले तरी, पाकच्या अंधाधुंद गोळीबारात सीमेवरील १६ निष्पाप भारतीय आणि २ जवानांच्या मृत्यूकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. भारताच्या आयएनएस विक्रांतने मध्यरात्री कराची बंदरावर हल्ले चढवल्याचे वृत्त अनेक माध्यमांमध्ये आले. याशिवाय भारताने पाकचे २ जे एफ १७ आणि एफ १६ फायटर जेट पाडल्याचा दावाही पाकच्या लष्करी अधिकाऱ्याने केला होता. कधी भारताने इस्लामाबादपर्यंत धडक मारली तर, कधी पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताचे सैन्य घुसल्याचेही दावे झाले. परंतु भारताने पाकच्या हल्ल्यांना संयमीपणे प्रत्युत्तर दिल्याचे सैन्याने स्पष्ट केले आहे. रात्रीच्या अंधारात पाककडून पुन्हा आगळीक होण्याची शक्यता असल्याने भारतीय सैन्य दल सीमेवर हायअलर्टच्या मोडमध्ये आहे. खर्च एकदाच काय तो होऊ दे, आता थांबायचं नाय, याच मानसिकतेमध्ये भारतीय जनता आणि सैन्य आहे. पाकने कुरापती न थांबवल्यास सूर्योदयाआधी पाकच्या नकाशावरून अनेक शहरे खरोखरच नष्ट झालेली दिसतील.

# जातनिहाय जनगणना समर्थन आणि विरोध!

**जनगणना करण्याबाबतचा भाजपचा निर्णय हा बिहार, उत्तर प्रदेशच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. तसेच विरोधी पक्षातील अनेकांनी कॉंग्रेस पक्षाच्या मागणीमुळेच सरकारवरती दबाव आल्याने निर्णय झाला, असे म्हटले आहे. परंतु गेली ५० ते ५५ वर्षे सत्तेत असताना कॉंग्रेस पक्ष जातनिहाय जनगणना का करू शकला नाही याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. भाजपने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेऊन एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साधला. जातनिहाय जनगणनेचे समर्थन आणि विरोध याही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात.**

केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ३० एप्रिल रोजी केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याचे पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले. या निर्णयाला सामाजिक समता व न्यायाचे समान वितरण करणारे ऐतिहासिक पाऊल म्हणावे लागेल. खरंतर अशा प्रकारची मागणी स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत असताना तत्कालीन राजकीय परिस्थितीत सरकारवर असलेल्या एका गटाच्या दबावातून ही मागणी मंजूर होऊ शकली नाही.

पहिली जातनिहाय जनगणना १९३१ साली झाल्यानंतर जवळजवळ ९५ वर्षं पुन्हा जातनिहाय जनगणना होण्यासाठी वाट पहावी लागली आहे. अखेर निर्णय झाला. या जनगणनेमुळे सामाजिक, आर्थिकदृष्टीने कोट्यवधी वंचितांना व मागे राहिलेल्या समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणार आहे.

खरंतर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती व जमाती यांना घटनात्मक आरक्षण मंजूर करून सामाजिक न्यायासाठी पहिले पाऊल टाकले. स्वातंत्र्यानंतर व्यापक प्रमाणात सर्व जातींची जनगणना करण्याचा सरकारने प्रयत्न केला नाही. १९५१ साली अनुसूचित जाती व जमातीचे वर्गीकरण करण्यात आले, खरंतर राजकीय व सामाजिक दबावाच्या कारणास्तव तत्कालीन सरकारने जाणीवपूर्वकरित्या जनगणना केली नाही, असा आरोप होतो.


त्यानंतर जनता सरकारच्या काळात सन १९७९ साली बी. पी. मंडल आयोग नेमून देशातील सर्वात मोठ्या ओबीसी घटकाला २७ आरक्षण मंजूर करण्यात आले, त्या निर्णयाला सर्वाच्च न्यायालयात इंदिरा साहणी खटल्यात मोठे आव्हान देण्यात आले. न्यायालयाने २७ टक्के आरक्षणाबाबत निर्णय कायम केला. जनगणनेच्या प्रश्नांचा फटका ओबीसी घटकाला बसला आहे. सन २०१० साली लोकसभा उपनेते भाजप खासदार गोपीनाथ मुंडे यांनी संसदेत जातनिहाय जनगणनेची मागणी केली.

त्यानंतर अनेक खासदारांच्या दबावानंतर तत्कालीन कॉंग्रेस सरकारने ती मंजूर केली, परंतु त्यांनी सन २०११ च्या जातनिहाय जनगणनेचा अहवाल जाणीवपूर्वक उघड केला नाही. केंद्र सरकार जातनिहाय जनगणना करत नाही, म्हणून बिहार राज्याने सन २०२३ सालात व्यक्तिगत जातनिहाय सर्वेक्षण अहवाल तयार करून त्याअनुषंगाने आरक्षणाची मर्यादा वाढवली. त्याला विरोध म्हणून अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आल्या, त्याला स्थगिती देण्यात आली.

आजसुद्धा 'आरक्षणाबाबत संख्येचा डेटा आणि सत्तेतील वाटा' या मुद्यांवरील वाद आजपर्यंत सुटू शकला नाही, तो या जनगणनेमुळे सुटण्याची शक्यता आहे. जवळजवळ १५० कोटींची लोकसंख्या असलेलल्या अनेक प्रांत, भाषा, धर्म जातीपातीमध्ये असलेल्या देशात अनेक वर्षापासून जातनिहाय जनगणनेची मागणी होत होती. परंतु तिचा आवाज स्वातंत्र्यानंतर ७८ वर्ष संसदेपर्यंत पोहोचत नव्हता, खरंतर यापूर्वी सरकारने गायी, गुरे, शेळ्या-मेंढ्या, जनावरांची सुद्धा गणती करण्याचा प्रयत्न केला.

परंतु पालात राहणाऱ्या, डोंगर दऱ्याखोऱ्यात वावरणाऱ्या, तीन दगडाची चूल, पाठीवर बिऱ्हाड असणाऱ्या, हातात कोणतीही सत्ता, संपत्ती तसेच राजकीय ताकद नसणाऱ्या चालत्या बोलत्या हाडामासांच्या माणसाची शिरगणती केली नाही. शेवटी मोदी सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. निर्णय जाहीर होताच सर्व समाजातून निर्णयाचे स्वागत करण्यात आले, सर्व राजकीय पक्षांत श्रेय लाटण्यासाठी चढाओढ निर्माण झाली आहे.

जातीनिहाय जनगणनेमुळे विविध जातींच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची माहिती मिळू शकते, ज्यामुळे सामाजिक न्याय आणि समान संधी सुनिश्चित करता येतात. जातनिहाय जनगणनेमुळे आरक्षणाचे योग्य नियोजन करता येते, ज्यामुळे मागासलेल्या जातींना न्याय मिळतो. काही वर्षांपासून विविध पक्ष आणि सामाजिक संघटना जातनिहाय जनगणनेची मागणी करत आहेत. केंद्र सरकारने नुकताच जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे.




जातनिहाय जनगणना केल्यास मागासलेल्या जातींची सामाजिक-आर्थिक स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजेल, ज्यामुळे त्यांच्या विकासासाठी योग्य उपाययोजना करता येतील. जातनिहाय जनगणनेमुळे आरक्षणाची योग्य अंमलबजावणी करता येईल, ज्यामुळे मागासलेल्या जातींना योग्य न्याय मिळेल. जातनिहाय जनगणनेमुळे जाती-आधारित सामाजिक ध्रुवीकरण कमी होण्यास मदत होईल.

जातनिहाय जनगणनेवर राजकीय वाद होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे जनगणनेचा योग्य वापर होऊ शकणार नाही. जातनिहाय जनगणना करणे प्रशासकीयदृष्ट्या कठीण असू शकते, ज्यामुळे जनगणनेची प्रक्रिया लांबू शकते. जातनिहाय जनगणनेमुळे लोकांची डेटा गोपनीयता धोक्यात येऊ शकते. जातनिहाय जनगणना सामाजिक न्याय आणि समान संधी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. तथापि, या जनगणनेमुळे राजकीय वाद आणि प्रशासकीय अडचणी येऊ शकतात. म्हणून, जातनिहाय जनगणनेचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

जनगणना करण्याबाबतचा भाजपचा निर्णय हा बिहार, उत्तर प्रदेशच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. तसेच विरोधी पक्षातील अनेकांनी कॉंग्रेस पक्षाच्या मागणीमुळेच सरकारवरती दबाव आल्याने निर्णय झाला, असे म्हटले आहे. परंतु गेली ५० ते ५५ वर्षे सत्तेत असताना कॉंग्रेस पक्ष जातनिहाय जनगणना का करू शकला नाही याचे उत्तर त्यांच्याकडे नाही.

भाजप हा वर्ण वर्चस्ववादी असल्याने जनगणना करू शकत नाही, अशी टीका करणाऱ्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी भाजपने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेऊन एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साधला. जातनिहाय जनगणनेचे समर्थन आणि विरोध याही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. विरोधकांच्या जनगणनेच्या मागणीची हवा काढून घेतली, जनगणनेच्या माध्यमातून ओबीसी व्होट बँक अधिक मजबूत करण्यासाठी मोठी खेळी खेळली. अशा परिस्थितीमध्ये खालील मुद्यांच्या कारणास्तव जनगणनेला समर्थन व विरोध होऊ शकतो.

**जनगणनेचे समर्थन**

सरकारला अनुसूचित जाती, जमाती आरक्षणाच्या वर्गीकरणासाठी डेटाची आवश्यकता आहे, ओबीसी आरक्षण प्रश्न सोडवण्यासाठी व सर्वोच्च न्यायालयात आरक्षण टिकवण्यासाठी इम्पेरियल डेटाची (शास्त्रोक्त सांख्यिकी/आकडेवारी) आवश्यकता, त्याअभावी लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका, भविष्यात लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांत होणारी वाढ तसेच पुनर्रचना, त्यासाठी लागणारी जातीय आकडेवारी तसेच एकूण सरकारी योजना, विकासात्मक धोरणांची अंमलबजावणी व खर्च करण्यासाठी जनगणना करण्याची आवश्यकता आहे.

सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा, संसाधने यांच्या असमान वितरणावरून समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी, जितनी उसकी संख्या भारी, उतनी उसकी भागीदारी, या तत्वाप्रमाणे संख्येचा डेटा उपलब्ध झाल्यास आरक्षणाचा प्रश्न सुटणार आहे. ओबीसी आरक्षण, तसेच आर्थिकदृष्ट्या मागासांसाठी ई.डब्ल्यू.एस. तसेच नोकरी, शिक्षणामधील सर्व प्रकारच्या आरक्षणाबाबत वाद संख्येच्या तुलनात्मक आणि माहितीच्या आधारे सोडवता येणार आहे.

**जनगणनेस विरोध**

जनगणनेस उघड विरोध करण्याची राजकीय पक्षांची ताकद नाही, परंतु अप्रत्यक्षरित्या मंडल आयोगाप्रमाणे, पडद्याआडून विरोध होण्याची शक्यता आहे. जातीय राजकारणाची गणिते बदलण्याची शक्यता असल्याने, आरक्षण वाद संपुष्टात येणारा असल्याने अनेक राजकीय पक्षांची समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. ज्या जाती समूहातील लोकांकडे सत्ता, संपत्ती व नोकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे, त्यात इतरांचा वाटा होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे त्यांच्याकडून या मुद्याला विरोध होण्याची शक्यता आहे. जनगणनेमुळे आरक्षणाची संपूर्ण गणिते बदलण्याची शक्यता आहे तसेच जातीय संख्येची आकडेवारी निश्चित झाल्यामुळे अनेक राजकीय पक्षांना तोटा होण्याची शक्यता असल्याने विरोध होण्याची शक्यता आहे तसेच समाजात जातीय ध्रुवीकरण वाढण्याची शक्यतासुद्धा आहे.

एकंदर जातनिहाय जनगणनेचा जनसामान्य, तळागाळातील, सुखसोयींनी वंचित घटकाला सरकार दरबारी न्याय मिळण्यास फायदा होणार आहे, तसेच जातीजातीत आरक्षणाबाबतचा वाद कायमचा थांबून सरकारला समाजातील प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र विकासात्मक योजनांची व धोरणांची आखणी करता येणार आहे. तसेच अनेक छोट्या जातीसमूहावरील सामाजिक, राजकीय, आर्थिक मुद्यावर होणारा अन्याय थांबून जनकल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. ही जनगणना सामाजिक समता व न्याय साध्य करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, इतकेच.

# 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी... पुढे काय?

**'लष्कर ए तोयबा', 'जैश ए मोहम्मद' आणि 'हिज्बुल मुजाहिदीन' या दहशतवादी संघटनांच्या पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील तळांना अचूकपणे उद्धवस्त करून भारतीय सैन्य दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी केले आहे. पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यातील आणखी एक टप्पा पूर्ण झाला आहे. आता प्रश्न आहे तो, इथून पुढे काय?**

काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांची निर्घृण हत्या करून दहशतवाद्यांनी भारताला जणू खुले आव्हान दिले. पुरुष पर्यटकांना त्यांच्या पत्नीच्या देखत आणि ते सुद्धा अत्यंत जवळून गोळी घालत दहशतवाद्यांनी क्रूरतेचे दर्शन घडविले. जगभर या हल्ल्याचा तीव्र निषेध झाला. याचनिमित्ताने पाकिस्तानसारख्या अत्यंत असंवेदनशील आणि दहशतवाद्यांना पाठिशी घालणाऱ्या देशाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला. अमेरिकेसारख्या महासत्ता असणाऱ्या देशावर ९/११चा हल्ला झाला. ओसामा बिन लादेन या दहशतवाद्याच्या नेतृत्वाखाली झालेला हा हल्ला अमेरिकेला चांगलाच जिव्हारी लागला. हाच ओसामा चक्क पाकिस्तानमध्ये होता. अमेरिकेने गेली अनेक दशके पाकला गोंजारले. आणि याच पाकमध्ये ओसामाला आश्रय देण्यात आला होता. अखेर अमेरिकेने ओसामाला ठार केले. त्यावेळीही आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकचे वाभाडे निघाले. अमेरिकेचे पैसे, साधने आणि सहाय्य घेणारा पाकिस्तान हा देशच अमेरिकेच्याच विरोधात क्रूर कृत्ये करणाऱ्यांना बळ देतो. आताही पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्य दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून पाकला चांगलाच झटका दिला आहे.

'ऑपरेशन सिंदूर'चे यश हे अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे. भारतीय सैन्य हे ठरवले तर काय करू शकते हे यातून दिसले. त्याशिवाय भारतीय गुप्तहेर खाते आणि विविध विभाग हे समन्वयाने किती प्रभावी मोहिम राबवू शकतात, भारतीय सैन्याला मोकळीक आणि संधी दिली, तर त्याचे ते सोने करतात, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व नियम, जबाबदारी आणि नैतिकता पाळून अतिशय व्यावसायिकरित्या भारतीय सैन्याने केवळ दहशतवाद्यांचे स्थळच नेस्तनाबूत केले, नागरी वस्ती किंवा पाक लष्करी वा अन्य ठिकाणांचे नुकसान केलेले नाही, अशा अनेकविध बाबी सिद्ध होत आहेत.

पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची प्रशिक्षण आणि अन्य स्थळे यापूर्वी भारताने सर्जिकल स्ट्राईकद्वारे नष्ट केली आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये मात्र पाकिस्तानातील दहशतवादी स्थळेही शोधण्यात आली आणि ती लक्ष्य करून उद्धवस्त केली आहेत. आंतरराष्ट्रीय सीमेपासून १०० किमी अंतरावरील आणि पंजाब प्रांतातील बहावलपूर, ३० किमीवरील मुरीदके आणि आठ किमीवरील सरजल या स्थळांवरील अचूक हल्ले हे अनेक अर्थाने महत्त्वाचे आहेत. कारण, पाकचे पंतप्रधान, लष्कर प्रमुख आणि अन्य महत्त्वाच्या व्यक्ती या पंजाब प्रांतातील आहेत. आणि त्यांच्याच प्रांतात दहशतवाद्यांची स्थळे असल्याचे सिद्ध झाले. आता पाकला तोंड दाखवायला जागा नाही. तरीही ते अनेक बनाव करू शकतात किंवा करतील. कारण कांगावा करण्यापलिकडे त्यांच्या हाती फार काही नाही. देशोधडीला लागलेले असतानाही केवळ द्वेष आणि दहशतवादाचा पुरस्कार करून पाक आणखीनच खोलात जातो आहे.




भारतीय सैन्य हे केवळ पाकव्याप्त काश्मीरच नाही, तर थेट पाकिस्तानातही अचूक हवाई कारवाई करू शकते, हे सिद्ध झाले आहे. आपल्याकडील युद्धसामग्री, लढाऊ विमाने, सैनिक, अधिकारी या साऱ्यांचा सराव आणि गुणवत्ता ही सर्वोत्तम असल्याचेही स्पष्ट झाले. एवढी मोठी कारवाई झाल्यानंतर पाकिस्तान असे म्हणू शकत नाही की, भारताने सामान्य नागरिक किंवा लष्करी ठाण्यांवर हल्ला केला आहे. तसेच, या हल्ल्यात जे मृत झाले आहेत त्यांना आपले म्हणायचे की नाही? अशाही पेचात पाक सरकार पडले आहे. कारण, दहशतवाद्यांना आपले म्हटले, तर जगभरात हा संदेश जाईल की, पाक त्यांना पोसतो आहे. शिवाय प्रतिमाही डागाळेल आणि दहशतवादी आपले नाही म्हटले, तर या बंडखोर संघटनांनाही कळून चुकेल की, पाक कसा दुटप्पी आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने आठवडाभर वाट पाहिली. पाकला वारंवार सांगितले की, तुमच्या अखत्यारीतील दहशतवादी स्थळांवर कारवाई करा; मात्र, पाकने त्याकडे कानाडोळा केला. अखेर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे पाक आणि दहशतवाद्यांना धडा शिकवला. आता प्रश्न उपस्थित होतो तो पुढे काय?

मोहिम यशस्वी झाली, तरी काही प्रश्न अनुत्तरीत आहेत. ते जाणून घ्यायला हवेत. या मोहिमेत भारताने किती आणि कुठली लढाऊ विमाने वापरली? ही मोहिम यशस्वीतेसाठी काय करण्यात आले? शिवाय या मोहिमेत भारताचे काही नुकसान झाले आहे का? भारताची राफेल ही लढाऊ विमाने आम्ही पाडल्याचा कांगावा पाकने केला तो खरा आहे का? की खोटा आहे? भारतीय सैनिक यात शहीद झाले का? याची उत्तरे लवकरच मिळतील, असे दिसते. कारण पुलवामा हल्ल्यानंतरचा सर्जिकल स्ट्राईक फत्ते झाल्यानंतर भारतीय सैन्याने सर्व खुलासे केले होते. आता तसे झालेले नाहीत. भारतीय सैन्याने पाकिस्तान हद्दीत जाऊन कारवाई केली की, आंतरराष्ट्रीय सीमेवरूनच क्षेपणास्त्रे डागली? हे सुद्धा स्पष्ट झालेले नाही. भारतीय सैन्याने हवाई हद्द ओलांडली असेल तर पाकच्या सुरक्षा यंत्रणा गाफील राहिल्या? की त्यांच्या यंत्रणा बनावट आहेत? चीनने दिलेली यंत्रणा कार्यान्वित नाही का? पाक स्वतःची हवाई सुरक्षा करू शकत नाही का? की भारतीय सैन्य हे सीमेवरूनही थेट १०० किमी अंतरावरील लक्ष्य भेदू शकते? या प्रश्नांची उत्तरे खुप महत्त्वाची आहेत.

'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचे मोजमाप करताना किती दहशतवादी ठार झाले? दहशतवाद्यांचे कंबरडे खरोखरच मोडले का? विशेष म्हणजे पहलगाम हल्ल्याच्या आठवडाभरानंतर कारवाई झाल्याने दहशतवाद्यांनी संबंधित स्थळांवरून सुरक्षित पलायन आणि मौल्यवान साहित्य वा सामग्री अन्यत्र स्थलांतरीत केली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण स्थळे निवडून ती नष्ट केली तरी त्याचा परिणाम किती झाला? कुख्यात मसूद अजहरचे १४ कुटुंबीय ठार झाल्याचे तेवढे समोर आले आहे. या तिन्ही दहशतवादी संघटनांचे नेटवर्क उद्धवस्त झाले असल्यास ते मोठे यश म्हणता येईल.

पाकिस्तान आणि तेथील दहशतवादी संघटना या शांत नक्कीच बसणार नाहीत. भारतीय कारवाईचा बदला घेण्यासाठी ते पुन्हा आक्रमक आणि सक्रीय होतील. भारतीय सैन्य हे संभाव्य हल्ले किंवा कारवाया कसे नष्ट करते? सीमेवरील तणाव आणि चकमकी यांना किती व कसे उत्तर दिले जाते? हे सुद्धा महत्वाचे आहे. भारताला आणखीनच डोळ्यात तेल घालून सज्ज रहावे लागेल. आता गाफील राहण्याची वेळ नाही. पाक युद्ध छेडणार नाही, पण तो नक्की काय करेल? हे सुद्धा सांगता येत नाही. 'ऑपरेशन सिंदूर'ने दहशतवादाचा पूर्णपणे खात्मा झालेला नाही, तर त्याची सुरुवात झाली आहे. त्यामुळे इथून पुढे आणखी सजग राहून कुटील कारस्थाने हाणून पाडायला हवीत.

भारतीय सैन्य जर इतकी अचूक कारवाई करू शकतात, मग त्यासाठी दहशतवादी हल्ला होण्याची वाट का पाहिली जाते? त्यांच्यावर वारंवार विश्वास का दाखवला जात नाही? मोकळीक का दिली जात नाही? वर्षातून एकदा किंवा वेळोवेळी अशा प्रकारचे ऑपरेशन्स राबवून दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचा पर्याय आपण का स्वीकारत नाही? पाकिस्तानला सर्व आघाड्यांवर उघडे आणि एकटे पाडूनच भारत यशस्वी होऊ शकतो. त्यासाठीची सर्वंकष रणनिती आपण आखायला हवी. तसेच, दहशतवाद्यांसह त्यांना विविध सहाय्य करणाऱ्यांनाही नष्ट केले, तरच दहशतवादाची लढाई निर्णायक ठरेल. त्याचबरोबर ज्या दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये धुमाकूळ घातला ते कोण होते? कुठून व कसे आले? किती दिवस भारतात राहिले? हल्ल्यानंतर कुठे व कसे गेले? त्यांना भारतात कुणी व कसे सहाय्य केले? हे सारे शोधणे, घरभेद्यांना हुडकून त्यांच्यावर कठोर कारवाई करणे हा सुद्धा दहशतवादविरोधी लढ्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे सुरुवात झाली असली, तरी आणखी अनेक टप्पे आपल्याला यशस्वी करायचे आहेत, हे सतत ध्यानी ठेवावे लागणार आहे. हाच 'ऑपरेशन सिंदूर'चा सांगावा आणि अन्वयार्थ आहे.

# 'लोक' राज्याची दवंडी




राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचा आदेश देऊन सर्वोच्च न्यायालयाने एका अथार्ने गेली तीन ते पाच वर्षे निपचित पडलेल्या स्थानिक लोकशाहीला पुन्हा जागे केले आहे. या आदेशामुळे राज्यातील २९ महापालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांमधील 'प्रशासक राज' संपुष्टात येऊन, स्थानिक कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती येणार आहे.

या संदर्भातील खटल्यांमध्ये महत्त्वाचा मुद्दा असलेल्या इतर मागासवर्गाच्या (ओबीसी) आरक्षणाबाबतही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे, आधीच्या २७ टक्के आरक्षणासह या निवडणुका होणार आहेत. मात्र, 'ओबीसी' आरक्षणाबाबतची सुनावणी सुरूच राहणार असून, त्यासाठी निवडणुका लांबणीवर टाकण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे निवडून येणाऱ्या 'ओबीसी' लोकप्रतिनिधींचे भवितव्य त्या खटल्याच्या अंतिम निकालाच्या अधिन असेल. येत्या चार आठवड्यांत निवडणुकांची अधिसूचना काढावी आणि चार महिन्यांत प्रक्रिया पूर्ण व्हावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. त्यामुळे अपवाद वगळता जवळपास संपूर्ण राज्याला पडलेल्या नोकरशाहीच्या विळख्यातून सुटका होऊन गावे आणि शहरांच्या विकासाचे चक्र सुरू होईल, अशी आशा आहे.

'घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होणे आवश्यक आहे,' अशी टिप्पणी न्यायालयाने केली असली, तरी या विषयावरील सर्वाधिक कालापव्यय न्यायालयीन प्रक्रियेतच झाला, ही वस्तुस्थिती आहे. करोना साथरोगाच्या काळात या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या. पाठोपाठ 'ओबीसी' आरक्षणाचा पेच उभा राहिला. नागपूर, अकोला, भंडारा आणि वाशीम या जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती-जमाती आणि 'ओबीसी' आरक्षणाने घटनेने घालून दिलेली ५० टक्क्यांची मयार्दा ओलांडल्यामुळे, 'ओबीसी' आरक्षण वगळण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने हे आरक्षण कायम ठेवण्याबाबत केलेली याचिकाही फेटाळून, याबाबत शास्त्रशुद्ध माहिती सादर करण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता.

दरम्यान, राज्य सरकारने याबाबत स्थापन केलेल्या बांठिया आयोगाने याबाबतचा अहवाल सादर केला. मात्र, त्यातून 'ओबीसीं'च्या सुमारे ३४ हजार जागा कमी होत असल्याचा आक्षेप न्यायालयात घेण्यात आला. आता बांठिया आयोगाच्या शिफारशीपूर्व तरतुदीनुसार, म्हणजेच सन २०२२च्या स्थितीतील २७ टक्के 'ओबीसी' आरक्षणासह या निवडणुका घेण्याचा आदेश देण्यात आल्याने सध्या तरी 'ओबीसीं'चे प्रतिनिधित्व कायम राहणार आहे. केंद्र सरकारने केलेल्या घोषणेनुसार जातनिहाय जनगणना झाल्यानंतर, अनेक राज्यांतील या संदभार्तील प्रश्न सुटू शकतात. मात्र, महाविकास आघाडी सरकारने मुंबईतील प्रभागांची संख्या वाढविण्याच्या विरोधातही एक याचिका सादर झाली होती. पुण्यातही काही गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्याने, प्रभागांची नव्याने रचना करावी लागणार आहे. ठिकठिकाणची प्रभागरचना, प्रभागांची म्हणजेच सदस्यांची संख्या किती असेल; तसेच ही प्रक्रिया राज्य सरकारच्या अधिपत्याखाली होणार की राज्य निवडणूक आयोगाच्या, या बाबतीतील चित्र स्पष्ट नाही. अपवादात्मक परिस्थितीत वेळ वाढवून मागण्याचाही पर्याय सरकारपुढे खुला आहे.

स्थानिक निवडणुकांची चाहूल लागल्याने कोशात गेलेल्या माजी आणि भावी लोकप्रतिनिधींमध्ये उत्साहाचे भरते आले नसेल, तरच नवल! विधानसभेची निवडणूक महायुतीने भरभक्कम जनादेशाने जिंकल्यानंतर भारतीय जनता पक्षाला सध्याची स्थिती अनुकूल वाटत असल्याने, सरकारनेही न्यायालयीन गुंता सोडविण्याची भूमिका घेतली, हे उघड आहे. सरकारला जड झालेल्या 'लाडकी बहीण'सारख्या योजना निवडणुकीपर्यंत नक्कीच रेटल्या जातील. सत्ताधाऱ्यांमधील धुसफूस लक्षात घेता महायुती एकत्र निवडणूक लढविणार की स्वतंत्र, याबाबत स्पष्टता नाही. महाविकास आघाडीतही तीच स्थिती आहे. शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येणार का आणि आघाडीचे काय होणार, ही उत्सुकतेची बाब आहे.

सत्ताधारी भाजपलाही इच्छुकांच्या मोठ्या भाऊगर्दीतून उमेदवार निवड आणि इतरांच्या नाराजीतून मार्ग काढावा लागेल; तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस काय करणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. अर्थात, राजकीय समीकरणांच्या फेरजुळणीत विजय कोणाचाही झाला, तरी निवडणुकांनंतर सत्तेवर येणाऱ्या लोकप्रतिनिधींमार्फत संबंधित गावे-शहरांच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णयांचा पाच वर्षांचा अनुशेष भरून काढण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.

कधीतरी उपमा जास्त होतो आणि उरतो. मग तो गारगुट्ट उपमा कोणीच खात नाही. काही वेळा ताजा उपमाही उरतो. कारण तो दडदडीत किंवा घट्ट होतो जो अजिबात खाल्ला जात नाही. अशा वेळी हा उपमा फुकट घालवण्यापेक्षा त्यापासून एक भन्नाट नाश्त्याचा पदार्थ बनवला तर...

# उपमा कटलेट्स



**साहित्य** – उरलेला उपमा १ वाटी (त्यात काजू असतील तर काढून टाका.) उकडलेला आणि किसलेला बटाटा अर्धी वाटी, चाट मसाला, आवडीप्रमाणे तिखट, थोडा ओवा, मीठ, साखर.

**कृती** – सर्व साहित्य एकत्र करून घ्यावे. लक्षात ठेवा मिश्रण पातळ नको तर घट्ट हवं. त्याचे छोटे छोटे गोळे अथवा टिक्की करून आवडीप्रमाणे तळून किंवा भाजून घ्यावे. याच्या टिक्की किंवा कटलेट नीट वळता येत नसतील तर अर्धा तास ते मिश्रण फ्रीजमध्ये उघडे ठेवावे.

**आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

# फेशियल करताना अशी घ्या काळजी



**काही** लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात.

तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले.

फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा.



फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा.

फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात.

फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

# घरचा वैद्य जाणून घ्या ५ उपाय

▮ **कांदा** – कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.



▮ **हळद** – शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीर-ावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** – हे अँटीबॅक्टेरिअल आणि अँटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

▮ **लवंग** – दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** – याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्त्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.

# कर्करुग्णांसाठी जीवनसत्त्व 'ड' लाभदायक

कर्करोग झालेल्यांनी किमान तीन वर्षे नियमितपणे जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेतल्यास ते जगण्याचा कालावधी आणखी काही वर्षे वाढू शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत अमेरिकेतील मिशिगन स्टेट विद्यापीठातील संशोधकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जीवनसत्त्व 'ड'मुळे हाडे मजबूत होण्याबरोबरच आणखीही महत्त्वपूर्ण लाभ होतात.




मिशिगन स्टेट विद्यापीठाचे तारेक हायकल यांनी सांगितले की, जीवनसत्त्व 'ड'च्या सेवनामुळे कर्करोग झालेल्या व्यक्तींमध्ये मृत्यूची जोखीम कमी झाल्याचा परिणाम चांगल्या प्रकारे दिसून येतो. पण त्याच वेळी या जीवनसत्त्वामुळे कर्करोगाला प्रतिबंध होऊ शकतो, असे दाखवणारा कोणताही पुरावा मिळू शकलेला नाही. या संशोधकांनी कर्करोग प्रतिबंधाचे उपचार झालेल्या ७९ हजारांहून अधिक रुग्णांची माहिती तपासली. ही माहिती विविध अभ्यासात नोंदवण्यात आली होती. या अभ्यासात जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार घेतलेल्या रुग्णांची तुलना करण्यात आली होती. हा कालावधी किमान तीन वर्षांचा होता. यात कर्करोग झाल्यानंतर मृत्यू झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या संशोधनात असे दिसून आले की, जीवनसत्त्व 'ड' घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार केलेले रुग्ण यांच्यातील मृत्यूच्या प्रमाणात मोठा फरक आहे. जीवनसत्त्व 'ड' हे कर्करुग्णांसाठी किती महत्त्वपूर्ण ठरते, हे यातून दिसून आले, असे हायकल म्हणाले. असे असले तरी जीवनसत्त्व 'ड'ची नक्की किती मात्रा घ्यावी आणि त्याची रक्तातील पातळी किती असावी, ही माहिती यात मिळाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# व्हॉट्सअॅपवर 'या' नंबरवरून फोन आला तर अजिबात उचलू नका! बँक अकाऊंट होईल रिकामे

व्हॉट्सअॅपचा वापर आपण सर्वच जण मोठ्या प्रमाणात करत असतो. एक इन्स्टंट मेसेजिंग अॅप म्हणून व्हॉट्सअॅप बेस्ट आहे. आपल्या नॉर्मल गप्पाटप्पांपासून ते ऑफिसची महत्त्वाची कामेही आपण या व्हॉट्सअॅपवर करत असतो. पण हे अॅप जेवढं उपयुक्त आहे तेवढंच धोकादायक आहे. आजकाल व्हॉट्सअॅपद्वारे कितीतरी स्कॅम होत असून अनेकजण यात फसले जात आहेत. आता आणखी एक नवीन प्रकरण समोर आले आहे. अनेकांना आंतरराष्ट्रीय नंबरवरून अचानक कॉल येत आहेत.

हे कॉल्स इथिओपिया (+251), मलेशिया (+60), इंडोनेशिया (+62), केनिया (+254), व्हिएतनाम (+84) आणि इतर यांसारख्या वेगवेगळ्या देशांचे आहेत. तर व्हॉट्सअॅप कॉल हे इंटरनेटद्वारे केले जातात. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही स्कॅम एजन्सी कार्यरत आहेत ज्या व्हॉट्सअॅप कॉलसाठी आंतरराष्ट्रीय नंबर विकत आहेत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॉल शुल्काची चिंता न करता या क्रमांकांवरून कॉल करू शकतात. अशाप्रकारच्या कॉल्समुळे तुमचा फोन हॅक होऊ शकतो, तुमचे बँकिंग डिटेल्सही समोरच्यांकडे जाऊ शकतात आणि तुमचं बँक खातं मोकळं होऊ शकतं. ट्विटरवरील अनेक वापरकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय नंबरवर एकापेक्षा जास्त वेळा कॉल येत असल्याचं सांगितलं आहे. जर तुमच्या बाबतीतही असेच होत असेल आणि तुम्हाला या समस्येपासून मक्ती मिळवायची असेल, तर तुम्हाला या नंबरवरून येणाऱ्या कॉल्सकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर तुम्हाला अचानक एखाद्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून कॉल दिसला तर तो ताबडतोब डिस्कनेक्ट करा. हा नंबर देखील ब्लॉक करा. ते तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतात आणि तुम्ही तुमचे बँक खाते साफ करू शकतात.

**जर तुम्हाला देखील सतत काही ठरावीक आंतरराष्ट्रीय नंबर्सवरून व्हॉट्सअॅपवर कॉल किंवा मेसेज येत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे. कारण हा तुमच्यासोबत स्कॅम असू शकतो.**



**हा व्हॉट्सअॅप स्कॅमही चर्चेत लोकांना व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे नोकऱ्या दिल्या जात असल्याचे मेसेज येत आहेत. हे लोक कोणत्या ना कोणत्या कंपनीचे असल्याचा दावा करतात आणि दररोज पैसे पुरवण्याची चर्चा करतात. घरबसल्या आरामात काम करता येतं असं म्हणतात. एकदा वापरकर्त्यांना त्यांचे पैसे मिळाले की ते स्कॅमरवर विश्वास ठेवू लागतात आणि मोठ्या घोटाळ्यात अडकतात. अशा घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अशा प्रकरणांपासून दूर राहण्याचीही गरज आहे.**

# धकाधकीच्या जीवनात ग्रीन टीचे फायदे

**आजचे** धकाधकीचे जीवन, बदलती जीवनशैली, बदलते आहार यांमुळे अनेक आजार डोकं वर काढत आहेत. एवढंच नाही तर वाढत्या कामाच्या तणावामुळे गेल्या काही वर्षांपासून ग्रीन टी नियमित पिणाऱ्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होताना दिसत आहे. योग्य आणि नियमित प्रमाणात ग्रीन टीचे सेवन शरीरास हितकारक ठरू शकते.




परंतु ग्रीन टीचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यास ते आरोग्यास घातकदेखील ठरू शकते. ग्रीन टीमध्ये थेनाईन तत्त्व जास्त प्रमाणात असतात, त्यामुळे अमिनो ॲसिड बनते. अमिनो ॲसिड शरीरात ताजेपणा कायम ठेवण्यास मदत करते. तसेच तुम्हाला थकवा जाणवत नाही. सध्या तरुणांमध्ये आणि वृद्धांमध्ये कॅव्हिटीच्या समस्या वेगाने वाढत आहेत. ग्रीन टीमध्ये कॅफीन असते जे दातांवरील किटाणू मारण्यास सक्षम असते. बॅक्टेरिया कमी झाल्याने अधिक काळापर्यंत तुमचे दात चांगले राहतात. सतत वाढत्या कामामुळे, दररोजच्या व्यस्त वेळापत्रकामुळे रक्तदाबाच्या समस्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. रक्तदाबाचा त्रास असल्यास त्यावर ग्रीन टी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे हृदयरोग असणाऱ्यांसाठी ग्रीन टीचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करण्यासाठी ग्रीन टी उपयोगी ठरते. ग्रीन टी प्यायल्याने शरीरातील मेटाबॉलिज्म रेट वाढतो ज्यामुळे पाचनक्रिया सुरळीत होते.



# पिअर्सिंग करताना द्या 'या' गोष्टींकडे लक्ष

बाजारामध्ये सध्या नवनवीन फॅशनचा ट्रेण्ड येत आहे. प्रत्येक ऋतूप्रमाणे हा ट्रेण्ड बदलत जातो. विशेष म्हणजे आजची तरुणाईदेखील हा फॅशन ट्रेण्ड उत्तमरित्या कॅरी करताना दिसत आहे. त्यातच मग पाहायला गेलं तर आज प्रत्येक तरुणाईच्या अंगावर टॅटू किंवा पिअर्सिंग दिसून येतात. अनेक जण आवड म्हणून तर काही जण केवळ फॅशन म्हणून या गोष्टी करतात. सध्या तरुणाईमध्ये पिअर्सिंगची मोठ्या प्रमाणावर क्रेझ दिसून येत आहे. मात्र, पिअर्सिंग करताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली पाहिजे. पिअर्सिंग म्हणजे शरीरावरील काही भागांवर रिंग किंवा अन्य एखादा दागिना टोचून घेणे. यामध्ये अनेक जण कान, नाक, भुवयी किंवा ओठांवर टोचून घेतात. मात्र, अनेक वेळा शरीरावर टोचून घेतल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.



● **संसर्ग होणे –**

पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यासोबतच एखाद्या एक्सपर्ट व्यक्तीकडून हे करून घ्यावं. कारण अनेक वेळा हलगर्जीपणामुळे पिअर्सिंग करताना रक्तात संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे जर संसर्ग झाल्याची शक्यता निर्माण झाल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

● **ॲलर्जी होणे–**

विशिष्ट धातूंचा वापर करून शरीरावर बॉडी पिअर्सिंग करण्यात येतं. काही जणांची त्वचा सेन्सेटिव्ह असते. त्यामुळे अशा व्यक्तींना या धातूपासून ॲलर्जी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक वेळा बॉडी पिअर्सिंग केल्यानंतर सूज येणे, रॅशेस येणे यासारख्या समस्या निर्माण होतात.

● **अतिरिक्त रक्तस्त्राव–**

बॉडी पिअर्सिंग करतान कधी कधी सुई चुकीच्या ठिकाणी टोचली जाते. परिणामी, अशा ठिकाणाहून रक्तस्त्राव होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पिअर्सिंग करताना विशेष काळजी घेण्याची गरज असते.

● **तज्ज्ञ व्यक्तीकडून पिअर्सिंग करावे –**

पिअर्सिंग कधीही या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा योग्य प्रशिक्षित व्यक्तीकडून करून घ्यावं. कमी अनुभवी व्य तकडून पिअर्सिंग करून घेतलं. तर त्याचा थेट परिणाम तुमच्या शरीरावर होऊ शकतो. चुकीच्या ठिकाणी पिअर्सिंग करून घेतल्या तर या ठिकाणचा भाग मृत होण्याची शक्यता असते.

# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम... अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं... त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डँड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.



# डायबेटिसपासून स्वताचे रक्षण करण्यासाठी हे टाळा

**सध्या जगातील सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे डायबेटिस... जगात भारत हा डायबेटिसचा मोठा बळी आहे. भारतात डायबेटिसग्रस्त लोकांची संख्या नवनवे आकडे पार करतेय. डायबेटिस पूर्णपणे बरा करता येत नसला तरी काही प्रमाणात रोखला जाऊ शकतो. त्यापासून स्वतःचे रक्षण करता येते. त्यामुळे तुम्ही या विकाराचे बळी होऊ नये म्हणून काही काळजी घेणे आवश्यक आहे.**



● **वजन घटवा**

तुम्ही जर स्थूल असाल तर तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न करा. जास्त वजन हे डायबेटिस होण्यासाठी पूरक असते. वजन घटवल्याने शरीरात तयार होणाऱ्या इन्शुलिनमध्ये वाढ होते आणि त्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होण्यास मदत होते.

● **नाश्ता करा**

सकाळी उठल्यानंतर दोन ते तीन तासांत नाश्ता करण्याची सवय स्वतःला लावून घ्या. यामुळे डायबेटिसचा धोका कमी होण्यास मदत होते. नाश्ता करणे अजिबात टाळू नका.

● **तंतूमय (फायबर) पदार्थांचे सेवन करा**

आहारात फळे, भाज्या, डाळी आणि टणक कवचाच्या फळांचा समावेश करा. तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश असणे फार गरजेचे आहे. आहारातून शरीरात येणाऱ्या शर्करेचे प्रमाण कमी करण्यास हे पदार्थ मदत करतात.

● **शारीरिक व्यायाम**

नियमित व्यायाम करणे तुमच्या आरोग्यासाठी गरजेचे आहे. व्यायामामुळे केवळ वजन कमी होते असे नाही, तर शरीरात उत्पन्न होणारे इन्शुलिन योग्य पद्धतीने वापरले जाते. त्यामुळे डायबेटिसचा धोका कमी होतो.

● **धूम्रपान टाळा**

तुम्ही जर धूम्रपान करत असाल तर ते आताच बंद करा. टाईप २ चा डायबेटिस धूम्रपानामुळे होण्याची मोठ्या प्रमाणात शक्यता असते. त्यामुळे या कारणाला बगल देणे गरजेचे आहे.



# हँड ड्रायरखाली हात सुकवणं धोकादायक, जाणून घ्या याचे कारण



**हॉटेल, थिएटरमध्ये, 'हँड ड्रायर'खाली हात सुकवणं सर्वाधिक धोकादायक असल्याचं एका संशोधनातून समोर आलंय. टॉयलेटमध्ये हँड ड्रायरमुळे हात आणि शरीरावर बॅक्टेरिया चिकटण्याची शक्यता जास्त असून तज्ञ डॉक्टरांनी याला दुजोरा दिला आहे.**

**विमानतळ**, रेस्टॉरंट, कॉर्पोरेट ऑफिस किंवा शहरातील काही टॉयलेटमध्ये हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरचा वापर केला जातो. ओले हात सुकवण्यासाठी हँड ड्रायरखाली काही सेकंद हात धरले जातात. त्यामुळे हात कोरडे होतात. पण अशा पद्धतीने हात सुकवणं आरोग्यासाठी घातक आहे. अॅप्लाईड आणि इन्वॉयर्नमेंटल मायक्रोबायोलॉगी जर्नलमध्ये छापण्यात आलेल्या एका संशोधनानुसार, हँड ड्रायरखाली हात सुकवल्याने आपल्या स्वच्छ हातावर पुन्हा जंतू किंवा बॅक्टेरिया बसण्याची शक्यता असते. ड्रायरच्या वापरामुळे हवेतील 'बॅक्टेरियल पॉथजीन्स स्पोअर्स' धारांमध्ये शिरू शकतात. ज्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. हँड ड्रायरच्या वापराने हातावर अधिक बॅक्टेरिया येण्याची शक्यता असते.

टॉयलेटमध्ये असणाऱ्या हवेत फ्लोटिंग बॅक्टेरिया असतात. त्यापैकी आपण हँड ड्रायरचा वापर करतो, त्या वेळी ते बॅक्टेरिया हातावर चिकटण्याची शक्यता असते. या बॅक्टेरियामुळे अनेक आजारही होऊ शकतात, असं सेंट जॉर्ज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर गायकवाड यांनी सांगितलं.

सशोधकांनी एक प्लेट ३० सेकंद हँड ड्रायरखाली धरली. या प्लेटवर १८ ते ६० विविध बॅक्टेरिया जमा झालेले दिसले. पण हँड ड्रायरच्या आतील बाजूस मात्र कमी प्रमाणात बॅक्टेरिया होते. हँड ड्रायर बंद करूनही प्लेट दोन मिनिटे धरली. त्या प्लेटवर कमी प्रमाणात बॅक्टेरिया आढळून आले. ही प्लेट पुन्हा टॉयलेटमध्ये फॅन सुरू ठेवून २० मिनिटे धरण्यात आली. या प्लेटवर १५ बॅक्टेरिया सापडले. मात्र, या मशीनशिवाय आपण टॉवेल किंवा टिशू वापरु शकतो आणि या मशीनचा वापर टाळू शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिलाय.

# मीरा-भाईंदरमध्ये भाजप-शिवसेना शिंदे गटात चुरस

**■भाईंदर** : मीरा-भाईंदर महापालिकेची मुदत ऑगस्ट २०२२ साली संपली असून २०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत २४ प्रभागमधून आणि ९५ नगरसेवक निवडून आले होते. आता देखील ९५ नगरसेवकांसाठी निवडणूक होणार की नगरसेवकांची संख्या वाढणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. महापालिकेत ९५ नगरसेवक तर ५ स्वीकृत सदस्य होते. २०१७ साली निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये भाजपचे ६१, शिवसेनेचे २२ व काँग्रेस आणि समर्थक १२ असे संख्याबळ होते. ऑगस्ट २०२२ मध्ये महापालिकेची मुदत संपल्यानंतर निवडणूक झाली नव्हती. २०१७ साली निवडून आलेल्या शिवसेना नगरसेवकांमध्ये आता शिंदेसेना व ठाकरे सेना अशी विभागणी झाली आहे. मात्र २२ पैकी नगरसेवक हरिश्चंद्र आमगावकर यांचे निधन झाले आहे. सेनेतून निवडून आलेल्या अनिता पाटील, दीप्ती भट, कुसुम गुप्ता व स्नेहा पांडे या ४ नगरसेविकांनी सेनेला जय महाराष्ट्र करत भाजपमध्ये दाखल झाले आहेत.



## मीरा-भाईंदरमध्ये कंटेनर कार्यालय वॉर

मीरा-भाईंदरमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या बेकायदा कंटेनर शाखा कार्यालयास विरोध करत आता महायुतीतील भाजपने सुद्धा महापालिका आयुक्त बंगल्यासमोरच कंटेनर कार्यालय खोलण्याचे जाहीर निमंत्रण सोशल मीडियावर दिले आहे. शिंदे गटाने २०२३ साली शहरात फूटपाथ, रस्ते आदी सार्वजनिक ठिकाणी कंटेनर ठेऊन शाखा सुरू केल्या. त्यावेळी भाजप, मनसे, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस आदींनी विरोध केल्यानंतर काही कंटेनर उचलण्यात आले, मात्र काही काळाने पुन्हा सर्वत्र कंटेनर शाखा सुरू झाल्या, त्यांना वीजपुरवठा देखील पुरविण्यात आला होता.

शिवसेनेचे माजी नगरसेवक नीलम ढवण, दिनेश नलावडे व अर्चना कदम हे अद्याप ठाकरे गटात आहेत. त्यामुळे शिंदे सेनेत २२ पैकी १४ माजी नगरसेवक उरले आहेत. भाजपचे परशुराम म्हात्रे शिंदेगटात गेले आहेत. तर भाजपाच्या अश्विन कासोदरियासह अन्य काही नगरसेवक शिंदे गटात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काँग्रेसचे १२ पैकी ३ माजी नगरसेवक नरेश पाटील, सारा अक्रम व अमजद शेख हे देखील भाजपमध्ये गेले आहेत. शहरात भाजपला मानणारा मतदार वर्ग जास्त असल्याने भाजपचे पालिकेत वर्चस्व राहिले आहे.

आता भाजपचे राजेश सिंह सोमवंशी यांनी थेट महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांना भेटून शिंदे शिवसेनेच्या अनधिकृत कंटेनर शाखांवर कारवाईची मागणी करत त्यांच्यावर कारवाई करणार नसाल तर पालिका आयुक्त यांच्या कनकिया येथील निवासस्थानाबाहेरील फुटपाथवरच कंटेनर ठेऊन भाजप पक्ष कार्यालय खोलण्यात येणार असल्याबद्दलची निमंत्रण पत्रिकाच सिंह यांनी जाहीर केली आहे.

१२ मे रोजी सायंकाळी ५ वाजता भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्या हस्ते उद्घाटन ठेवण्यात आले आहे. महापालिका आयुक्त मोठ्या दिलाचे असून आता दुकान विकत घेण्याची गरज नाही. शहरात जिथे मन झाले तिथे कंटेनर ठेवून दुकानदार, इस्टेट एजंट, कपडेवाले, राजकारणी, कार्यालय उघडू शकता, शहर लावारीस झाले असे आ. नरेंद्र मेहतांनी म्हटले आहे.

## स्टेमच्या धर्तीवर प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी

अंबरनाथ नगरपालिका, बदलापूर नगरपालिका यामधील विकासकामांना तांत्रिक मंजुरी देण्याची प्रक्रिया मजीप्राचे अस्तित्वातील मनुष्यबळ (स्थापत्य, विद्युत अभियंते) करत आहेत. त्यातूनही मजीप्राला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. तो निधी देखील या दोन्ही शहरांतील पाणीपुरवठा सुरळीत, सक्षम व गळतीमुक्त करण्यासाठी भांडवली खर्च करण्यासाठी वापरणे गरजेचे असल्याची मागणी शिंदे यांनी केली आहे. स्टेमच्या धर्तीवर प्राधिकरण स्थापन करण्याची मागणीही शिंदे यांनी केली आहे.



# ठाणे, नवी मुंबईपेक्षा बदलापूरचे पाणी महाग

**■बदलापूर** : अंबरनाथ व बदलापूरला पाणीपुरवठा करणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) पाणी बिलासाठी सर्वाधिक दर आकारणी करीत आहे. ठाणे, नवी मुंबईसारख्या शहरांपेक्षाही हे पाण्याचे दर अधिक आहेत. त्यामुळे बदलापूरकरांना सर्वात महागडे पाणी प्यावे लागत आहे. मात्र त्यानंतरही पाणीपुरवठा सुरळीत, सक्षम व गळतीमुक्त करण्यात मजीप्रा अपयशी ठरली असल्याचा आरोप होत आहे. मजीप्राच्या माध्यमातून अंबरनाथ आणि बदलापूर या दोन शहरांना पाणीपुरवठा केला जातो. मजीप्रा येथील पाणी वितरण, देखभाल दुरुस्ती, जल उदंचन, जल शुद्धीकरण प्रकल्प चालवणे अशी कामे करते. यासाठी मजीप्राकडून आकारण्यात येत असलेले पाणी बिलाचे दर सर्वाधिक असल्याचा दावा भाजपाचे ठाणे जिल्हा महामंत्री व माजी नगरसेवक संभाजी शिंदे यांनी केला आहे. घरगुती वापराच्या पाण्यासाठी मजीप्राकडून प्रति हजार लिटरसाठी १३.३० रुपये दर आकारला जातो, तर प्रति हजार लिटरसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ६.३० रु., ठाणे महानगरपालिका ६.७० रुपये व नवी मुंबई महानगरपालिका ५ रुपये याप्रमाणे बिल आकारणी करते. म्हणजेच अंबरनाथ व बदलापूर शहरातील नागरिकांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सर्वाधिक महागडे पाणी प्यावे लागत असल्याचे संभाजी शिंदे यांचे म्हणणे आहे.

# क्षयरोग रुग्णांचा शोध घेण्यासाठी एआयची मदत... एकाच वेळी ८५ रुग्णांचे एक्स-रे

**■ठाणे** : ठाणे जिल्ह्यात क्षयरोग रुग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर उत्तम उपचार मिळावा, यासाठी क्षयरोग शोधमोहीम राबविण्यात येत आहे. दुसरीकडे आता अशा रुग्णांचे तत्काळ निदान व्हावे, या उद्देशाने आरोग्य प्रशासनाने एआय तंत्रज्ञानाची मदत घेण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार मागील दोन महिन्यांत याच एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ८५ रुग्णांचे एक्स-रे काढण्यात आले आहेत. यात निदान झालेल्या रुग्णांवर तत्काळ उपचारही सुरू करण्यात आले आहेत.

ठाणे पालिकेची आरोग्य यंत्रणा, आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्यसेवक तळागाळात जाऊन क्षयरोग निर्मूलनाचे कार्य करीत आहेत. अशातच आता, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी प्रशासकीय कामकाजात गतिमान व पारदर्शकता आणण्यासाठी एआयचा वापर करण्यावर भर दिला आहे. त्यानुसार आता क्षयरोग रुग्णांचे निदान तत्काळ व्हावे, यासाठी आता एआयची मदत घेत एक्स-रे काढण्यात येत आहे. या मशीनद्वारे क्षयरोग रुग्णांचे एक्स-रे काढण्यात येत आहे. त्यानुसार मागील दोन महिन्यांत शहापूर, मुरबाड, भिवंडी तालुक्यातील ८५ रुग्णांचे एक्स-रे काढण्यात आले असून निदान झालेल्या रुग्णांवर तत्काळ उपचार सुरू करण्यास मदत झाली असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने दिली.



### असे होते कार्य

टीबीच्या लक्षणांसाठी एआय क्ष-किरणांचे विश्लेषण करते. एआय क्षयरोगाची प्रारंभिक चिन्हे ओळखते, जरी रोग त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात असला तरीही कार्य होते. क्ष-किरण डिजिटायझेशन करण्यासाठी मशीनला लॅपटॉप कॅमेऱ्यासोबत जोडले जाते. डिजिटाइज्ड एक्स-रे निदानासाठी डॉक्टरकडे ऑनलाइन पाठवला जाऊ शकतो.

### हे आहेत फायदे

क्षयरोगाची प्रकरणे लवकर ओळखून क्षयरोगाचा प्रसार रोखण्यात मशीन मदत करू शकते, वेळेवर उपचार सक्षम करून रुग्णाचे परिणाम सुधारण्यास मदत होते. मशीन टीबी निदान अधिक परवडणारे बनविण्यात मदत करते.

# भिवंडीत पुन्हा ३ बांगलादेशींना अटक

**■भिवंडी** : बांगलादेशातून भारतात घुसखोरी करून भिवंडीत अवैधपणे वास्तव करणाऱ्या बांगलादेशींवर पोलिसांची अटकेची मोहीम सुरू असून मंगळवारी शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईत आणखी ३ बांगलादेशींना ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्यामुळे आठवडाभरात अटक केलेल्या बांगलादेशी नागरिकांचा आकडा ११ वर जाऊन पोहचला आहे.यामध्ये बांगलादेशातील रंगपूर जिल्ह्यातील एका ४० आणि २५ वर्षीय महिलांचा समावेश असून त्या हनुमान टेकडी परिसरात देहविक्रीचा व्यवसाय करत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. तर मोहमद ईस्माइल हुसेन उर्फ ईस्माइल फैजुररहमान अन्सारी (४५) हा बांगलादेशातील ढाका राज्यातील असल्याचे समोर आले असून तो भिवंडीत बिगारी काम करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. वरील दोन महिला आणि इस्माईलकडून ६ हजार रुपयांचे दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. दरम्यान सोमवारच्या कारवाईत पोलिसांनी आसिफ आतिक शेख (२४) मोहम्मद आलीम अमजद खान (४०) यासमीन मोहमंद सोफी शेख (३३) शरीफुल गुलाम शेख (४१) या चौघांना अटक केली होती. तर ३० एप्रिल रोजीच्या दोन कारवाईत शहर पोलिसांनी हबीब इद्रीस शेख (४०) यास धामणकर नाका परिसरातील नौशाद हॉटेलच्या मागील पटेल कंपाऊंड मधून ताब्यात केली होती. त्याचप्रमाणे देहविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या बांगलादेश मधील नौसंदी जिल्ह्यातील एक ४० वर्षीय आणि दुसरी बिबारिया जिल्ह्यातील ५० वर्षीय महिला यांना हनुमान टेकडी परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली होती. तर कोनगाव पोलिस ठाणे हद्दीतील अंतरा दिपक हजरा (३५) ही बांगलादेशातील जिहिंदा जिल्ह्यातून अवैधपणे भारतात येवून भिवंडीतील गोवे गावात राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने कोनगाव पोलिसांनी तिच्याविरोधात अटकेची कारवाई केली आहे.

# आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार

## हजार रुपयांसाठी रुग्णवाहिका नाकारली, महिलेचा महापालिका रुग्णालयाच्या दारात मृत्यू

### पोलीस दलातील दोन पोलीस कर्मचारी बडतर्फ

बीड जिल्हा पोलीस दलातील आणखी दोघा कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलंय. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ही कारवाई केलीय. पोलीस अधीक्षकांच्या घरी सुरक्षारक्षक म्हणून नियुक्ती असलेल्या आणि वाळू माफियांना मदत केलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस सेवेतून बडतर्फ केल गेलंय. बाळू गहिनीनाथ बहिरवाळ हा पोलीस कर्मचारी पोलीस अधीक्षकांच्या घरात गांजा ओढताना आढळून आला होता. याच अनुषंगाने त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. तर रामप्रसाद शिवनाथ कडूळे या पोलीस कर्मचाऱ्याने वाळू माफीयांना मदत केली होती. याच अनुषंगाने या पोलीस कर्मचाऱ्याला अटक देखील झाली होती. या दोन्ही प्रकरणात पोलिसांची प्रतिमा डागाळल्याने त्याची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी या दोघांचे निलंबन करत सेवेतून बडतर्फ केले आहे.

**■नवी मुंबई** : पाच तास रुग्णवाहिकेला उशिर झाल्याने एका महिलेचा कल्याण डोंबिवली महापालिकेच्या बाई रुक्मिणीबाई रुग्णालयाच्या दारातच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणात आयुक्त अभिनव गोयल यांनी मोठी कारवाई केली असून या प्रकरणी चार कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे. कंत्राटी पद्धतीवर असलेल्या एका मेडिकल ऑफिसरसह एका स्टाफ नर्सला कायमस्वरूपी सेवामुक्त करण्याचे आदेश दिले आहे. मात्र या घटनेमुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली असून रुग्णालय प्रशासनाविरोधात रोष पाहायला मिळत आहे.

**आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार, चार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा**

मिळालेल्या माहितीनुसार,



कल्याण पूर्वेत राहणारी सविता बिराजदार या महिलेला केडीएमसीच्या रुक्मीणीबाई रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी कळवा रुग्णालयात हलविण्यास सांगितले होते. मात्र तिला कळवा रुग्णालया नेण्याकरीता वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही. तब्बल पाच तास रुग्णवाहिकेच्या प्रतिक्षेत असलेल्या महिलेचा रुग्णालयाच्या दारात मृत्यू झाला. यावरुन महापालिकेच्या रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार समोर आला. या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश केडीएमसी आयुक्त गोयल यांनी आरोग्य खात्याचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांना दिले होते.

उपायुक्त बोरकर यांनी या प्रकणातील चौकशीचा अहवाल आयुक्तांकडे सादर केला. या अहवालापश्चात आयुक्तांनी सहा जणांच्या विरोधात कारवाई केली आहे. या प्रकरणात रुग्णवाहिका चालक हरिश्चंदर यशवंतराव, प्रमोद लासूरे, वाहन चालक मारुती निकम, सिस्टर इनचार्ज जयश्री रायकर यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे. तर कंत्राटी पद्धतीवर असलेले मेडिकल ऑफिसर डॉक्टर. उमर पटेल आणि स्टाफ नर्स नमिता भोये यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे.

# बेवारस वाहने हटवण्याच्या कारवाईला सुरुवात

## संभाव्य नुकसानीला वाहनमालक जबाबदार : महापालिका

**■भिवंडी** : भिवंडी शहरातील बेवारस वाहने हटवण्याबाबतचा अधिकार महापालिकेला महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार प्राप्त झाला असून अशी बेवारस वाहने हटवण्याचे आवाहन नागरिकांना मनपाकडून करण्यात आले आहे, तर अशी बेवारस वाहने हटवण्याची कारवाई महापालिकेकडून लवकरच सुरू केली जाणार असून होणाऱ्या नुकसानीला सर्वस्वी वाहनमालकच जबाबदार असल्याची माहिती महापालिकेच्या वाहन विभागाने प्रसिद्ध केलेल्या एका परिपत्रकानुसार देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार



महानगरपालिका आयुक्तांना महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर वा पदपथावर ठेवण्यात आलेली वाहने नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

या महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमानुसार वाहनांवर दंडात्मक कारवाई करणे व बेवारस वाहनांचा लिलाव करण्याचा ठराव १७ एप्रिल रोजी पारित झाला आहे. त्यामुळे महानगरपालिका हद्दीत रस्त्यावर, पदपथावर व महानगरपालिकेच्या अन्य क्षेत्रामध्ये बेकायदेशीरपणे उभी केलेली अथवा बेवारस वाहने न हटविल्यास महानगरपालिकेमार्फत सदर वाहने हटवून वाहन हटविण्याच्या खर्चापोटी (टोइंग व पार्किंग) ची रक्कम, तसेच दंड वसूल करून सदर कार्यवाहीमुळे होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी वाहनमालक जबाबदार असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे.

# कर्करोगावरील औषधाच्या मानवी चाचणीला परवानगी द्या

## नाशिकच्या औषध संशोधन कंपनीची हायकोर्टात याचिका

**■मुंबई** : कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांच्या मानवी चाचण्या घेण्याची परवानगी द्या, अशी विनंती करणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने नाशिकच्या औषध संशोधन कंपनीने दाखल केलेल्या या याचिकेवर केंद्र सरकारसह संबंधित विभागाला नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. कर्करोगावरील औषधांच्या संशोधनात कार्य करणाऱ्या नाशिकस्थित दातार कॅन्सर जेनेटिक्सने २२ एप्रिल रोजी केंद्रीय औषध मानके नियामक संघटनेकडे (सीडीएससीओ) अर्ज करून मानवी चाचणीस परवानगी मागितली होती. ती फेटाळण्यात आल्याने कंपनीने त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली. सीडीएससीओचा आदेश मनमानी, अवैज्ञानिक आणि कायद्याची फसवणूक करणारा आहे असा आरोप करून तो रद्द करावा, अशी विनंती याचिकेत केली आहे.




# अवकाळीने वीटभट्टी मालक आर्थिक डबघाईला

**■भिवंडी** : मंगळवारी रात्रीच्या सुमारास भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह ढगांच्या गडगडाटाने आणि विजांच्या कडकडाटाने अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या अवकाळी पावसाने वीटभट्टी मालकांवर अवकळा आल्याची स्थिती झाली आहे. दुसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी देखील झालेल्या संतत धारेने वीटभट्टीच्या शेवटच्या टप्प्यात या व्यवसायाला चांगलाच तडाखा दिला आहे. त्यामुळे वीटभटी मालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

एप्रिल-मे या महिन्यात कडक उन्हाळा असल्याने विटांचे उत्पादन मोठ्या संख्येने घेता येते. त्याच प्रमाणे या उन्हाळी वातावरणात कच्च्या विटा सुकल्यानंतर ग्रामीण भागात विटांच्या भट्ट्या देखील मोठ्या संख्येने लावल्या जातात. या पोषक वातावरणात विटा उत्तमप्रकारे भाजून निघतात. एकाचवेळी भट्ट्या लावण्यासाठी काही व्यावसायिक केवळ भट्ट्या रचून देखील ठेवतात. मात्र मंगळवारी झालेल्या अवकाळी पावसाने मातीच्या कच्च्या विटांचा तयार माल पावसात भिजून संपूर्ण विटांच्या मालाची नासधूस झाली आहे. मंगळवारी रात्रीपासून अचानकपणे सुरु



झालेल्या अवकाळी पावसापासून रचलेल्या भट्ट्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विट मालक आणि कामगार यांची कच्च्या विटांवर ताडपत्री आणि प्लास्टिक कापड टाकण्यासाठी धावपळ झाली. अचानक अवकाळी पाऊस सुरु झाल्याने मे आणि जून महिन्याचे उत्पादन कसे घेता येईल ? अशी चिंता वीट मालकांना सतावू लागली आहे.

वीट कामगार हे वीट कामासाठी येण्या अगोदर हिवाळा आणि उन्हाळ्याच्या दोन्ही हंगामाचे आगाऊ पैसे घेतात. त्याशिवाय काम करीत नसल्याने झालेले नुकसान कसे भरून येईल? तसेच पावसात भिजलेल्या विटांचे देखील नुकसान झाले आहे. असा दुहेरी फटका वीट व्यावसायिकांना बसला आहे. विट व्यवसाय हा शेतकर्यांचा जोडधंदा असून शेतीची कामे संपल्यानंतर शेतामध्ये वीट व्यवसायास सुरुवात केली जाते. मात्र यावेळी जून मध्ये सुरु होणार पाऊस मे महिन्यात सुरु झाल्याने शेतकर्यांचे व्यावसायिक गणित बिघडले आहे. गेल्या काही दिवसांपासून हवामान खाते अंदाज देत होते. परंतु पावसाच्या लहरी पणामुळे शेतकर्यांनी याची दाखल घेतली नाही. त्यामुळे त्यांना नुकसानीला समोरे जावे लागले आहे. मात्र गेल्या तीन महिन्यापासून उन्हाच्या काहिलीने त्रस्त झालेल्या नागरिकांना मंगळवारपासून सुरु झालेल्या अवकाळी पावसाने दिलासा मिळाला असून मंगळवारी रात्रीच्या अचानक झालेल्या पावसाने हवेत अचानक गारवा पसरला होता.त्यातच ग्रामीण भागात वीज गेल्याने शहर व ग्रामीण परिसर अंधारात बुडाले होते.

# बनावट नोटांचा कारखाना उद्ध्वस्त

**■भिवंडी** : गुन्हे शाखा घटक २ च्या पोलीस पथकाने बनावट नोटा तयार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करून सहा जणांना ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून तब्बल ४५ लाख ५० हजार रुपयांच्या भारतीय चलनातील ५०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या. तसेच बनावट नोटा तयार करण्याचे साहित्यही जप्त केले आहे. सुरज तानाजी शेंडे, भरत वाळकु सासे, स्वप्नील जगदीश पाटील, रामदास शालिक दळवी, विजय सुदाम कर्णेकर उर्फ विकी, शेखर रामदास बत्तीन अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही इसम बनावट नोटा तयार करून त्या खुल्या बाजारात खऱ्या नोटांशी अदलाबदल करून चलनात आणण्यासाठी भिवंडीतील अवचित पाडा येथील मकदुमीया कॅफे जवळ येणार असल्याची माहिती गुन्हे



शाखेच्या पोलीस पथकाला मिळाली. त्यानुषंगाने गुन्हे शाखा घटक २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सह पोलीस निरीक्षक धनराज केदार यांच्यासह पोलीस पथकाने ३ मे रोजी सापळा रचून सूरज, भरत आणि स्वप्नील या तिघांना झडप घालून ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्याकडून ५०० च्या बनावट नोटांचे एकूण ६० बंडल त्यामध्ये प्रत्येकी १०० नोटा असे एकूण ३० लाख रुपये जप्त करण्यात आले.

दरम्यान त्यांच्याकडे पोलिसांनी अधिक कसून चौकशी केली असता रामदास, विजय आणि शेखर या तिघांसोबत मिळून बनावट नोटा तयार करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या तिघांनाही गुन्हे शाखेने ५ मे रोजी सापळा रचून ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्यांच्याकडून बनावट नोटा छापण्यासाठी वापर केलेला लॅपटॉप, प्रिंटर, बनावट नोटांचे खऱ्या नोटांच्या मापात कटींग करण्यासाठी वापरलेले कटर, नोटा छापण्यासाठी लागणारे बॉन्ड पेपर आणि १५ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटांसह साहित्य जप्त केले आहे. अशा प्रकारे बनावट नोटा तयार करणाऱ्या रॅकेटकडून ४५ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक श्रीराज माळी,रविंद्र पाटील, एएसआय राजेश शिंदे, सुधाकर चौधरी, पोलीस हवालदार सुदेश घाग, प्रकाश पाटील, साबीर शेख, सुनिल साळुंखे, प्रशांत राणे, राजेश गावडे, किशोर थोरात, निलेश बोरसे, सचिन जाधव, पोलीस कर्मचारी माया डोंगरे, दक्षता सुतार, पोलीस कर्मचारी सायली गंभेरा, पोलीस शिपाई अमोल इंगळे, भावेश घरत, विजय कुंभार आदी पोलीस पथकाने केली आहे.

# बीडजवळ भीषण अपघात, कारची लक्झरी बसला धडक

**■बीड** : राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढल्याचे पाहायला मिळत असून केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत चिंता व्यक्त केली होती. वर्तमानपत्रात किंवा माध्यमांमध्ये सातत्याने अपघाताच्या बातम्या येत असून महामार्गावरच हे अपघात घडत असल्याचे दिसून येते. आता, बीड जिल्ह्यातील पाटोद्याजवळ एका भीषण अपघातात वडिल आणि मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दरम्यान, दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.

बीडच्या पाटोदा शहराजवळ पुण्याहून केजकडे जाणारी भरधाव वेगातील कार पुलाच्या कठड्याला धडकून ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात अश्फाक शेख (४० वर्षे) आणि त्यांचा मुलगा अल्ताफ शेख (१५ वर्षे) हे दोघेही जागीच ठार झाले आहेत. पुण्यावरुन हे दोघेही आपल्या गावी म्हणजेच केजकडे येत होते. मात्र,



पाटोदाजवळ आले असता त्यांच्या कारचा अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती कार पुलाच्या कठड्याला धडकली. त्यानंतर तीन पलट्या खाऊन समोरून येणाऱ्या एका खासगी कंपनीच्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. त्यात कारमधील दोघांचाही मृत्यू झाला.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पाटोदा पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत कारमधून मृतदेह बाहेर काढले. त्यानंतर, मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com